शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३३५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अनुदान घोटाळ्यातील दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेसह सातबारावर बोजा टाकून वसुली करा

### आमदार बबनराव लोणीकरांचे विधानसभेत लक्षवेधी

**मुंबई । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात २०२२ २०२३ आणि २०२४ मध्ये अतिवृष्टी पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई अनुदान घोटाळ्यासंदर्भात ७४ अधिकारी कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत परंतु गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीने वर्गवारी करून बऱ्या अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत केला. जोशी आढळलेल्या ७४ अधिकारी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची संपूर्ण मालमत्ता जप्त करावी तसेच त्यांच्या मालमत्तेवर किंवा सातबारावर बोजा टाकून त्यांच्याकडून संबंधित अपहाराची रक्कम वसूल करण्यात यावी अशी जोरदार मागणी देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि गारपिटी अनुदानातील सुमारे १०० कोटींच्या महाघोटाळ्याचा मुद्दा पुन्हा एकदा प्रखरपणे उपस्थित केला. या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सरकारचे लक्ष वेधत, शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाला वाचा फोडली आणि तात्काळ कठोर कारवाईची गरज असल्याचे विधिमंडळाच्या सभागृहात आपली भूमिका परखडपणे मांडली.

जालना जिल्ह्यात २०२२ ते २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसानीसाठी शासनाने संपूर्ण जालना जिल्ह्यासाठी ११०३ कोटी रुपये अनुदान मंजूर केले होते, परंतु यापैकी सुमारे ५६ कोटी रुपये बनावट शेतकरी दाखवून, दुबार अनुदान वाटप करून आणि शासकीय जमिनींच्या नावावर लाटण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. तहसीलदार उपविभागीय अधिकारी अप्पर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी शासनाला आणि लोकप्रतिनिधींना दिलेल्या आकडेवारी मध्ये देखील मोठी तफावत दिसून




येते. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार ३४.९७ कोटींचा अपहार उघड झाला असला, तरी लोणीकर यांनी हा घोटाळा १०० कोटींपेक्षा जास्त असू शकतो दावा केला आहे.

एकूण २,५७,२९७ शेतकऱ्यांपैकी ६३ हजार १९४ शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत अनुदान प्राप्त झालेले नसून अंबड व घनसावंगी या दोन तालुक्यातील १५०३१ शेतकऱ्यांची केवायसी प्रलंबित असल्यामुळे अद्याप पर्यंत या शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. अंबड घनसावंगी मधील ३६ हजार शेतकऱ्यांनी या संदर्भात मोर्चा काढला होता. अद्याप पर्यंत जालना जिल्ह्यातील हजारो शेतकरी केवायसी प्रलंबित असल्यामुळे अनुदानापासून वंचित राहिले पान २ वर

## युवक कल्याण शिबिरासाठीचे सात वर्षापासून बंद अनुदान सुरू करावे

### सेवाभावी संस्थांचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे



**जालना । प्रतिनिधी -** युवक कल्याण शिबिरासाठी सेवाभावी संस्थांना मिळणारे अनुदान जालना जिल्ह्यात २०१८ पासून बंद करण्यात आलेले असून, याविरोधात जालना जिल्ह्यातील तायक्कांदो, ऑलिंपिक आणि मार्शल आर्ट्सह विविध संघटनांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यात प्रशासनाच्या अनुदानविषयक धोरणांवर आणि क्रीडा सुविधांवरील उदासीनतेवर ताशेरे ओढण्यात आले आहेत.

तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा ऑलिंपिक पान २ वर

### सेवाभावी संस्थांचे कौतुक फक्त मंचावरच; प्रत्यक्षात होतोय अन्याय!

विविध सेवाभावी संस्थांच्या व्यासपीठावरून प्रशासनातील अधिकारी या संस्थांचे तोंडभरून कौतुक करतात. मात्र, प्रत्यक्षात या संस्थांना कोणतेही शासकीय सहकार्य मिळत पान २ वर

### डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादरीकरण ऑनलाईन पद्धतीने बंधनकारक

## लाभार्थ्यांसाठी Beneficiary Satyapan App अनिवार्य - तहसीलदार डॉ. गोरे

**परतूर । प्रतिनिधी -** केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग योजनेतील लाभार्थ्यांसाठी आता डिजिटल जीवन प्रमाणपत्र (Digital Life Certificate) ऑनलाईन पद्धतीने सादर करणे बंधनकारक करण्यात आले असून, संबंधित लाभार्थ्यांनी यास अनिवार्यपणे पालन करावे, असे आदेश राज्य सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात आले आहेत.

या संदर्भात ०८ जुलै २०२५ रोजी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांनी 'Beneficiary Satyapan App' द्वारे ऑनलाईन प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया adhaarFaceRd App आणि Beneficiary Satyapan App द्वारे पार पडणार असून, मोबाईल फोनच्या माध्यमातूनच घरबसल्या ओळख पडताळणी करून प्रमाणपत्र सादर करता येणार आहे.

प्रमाणपत्र न सादर केल्यास लाभार्थ्यांचा निवृत्तिवेतन / निधी वितरण थांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ही प्रक्रिया जवळच्या सेवा केंद्रातून किंवा आपल्या मोबाईलवरून करता येणार आहे.

दरम्यान, तालुक्यातील सर्व लाभार्थ्यांनी Beneficiary Satyapan App च्या माध्यमातून त्वरित डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करून आपला हक्काचा लाभ सुरळीत सुरू ठेवावा, असे आवाहन परतूर तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी केले आहे.

**प्रक्रिया पुढीलप्रमाणे:**

Google Play Store वरून adhaarFaceRd App व Beneficiary Satyapan App डाउनलोड करावेत.

Beneficiary Satyapan App उघडून भाषा निवडावी.

आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल टाकून डिव्हाइस रजिस्ट्रेशन करावे.

OTP टाकून रजिस्ट्रेशन पूर्ण करावे.

त्यानंतर फेस ऑथेंटिकेशनद्वारे ओळख पडताळणी करावी.

ओळख पडताळणी पूर्ण झाल्यानंतर Beneficiary Verification Certificate प्राप्त होईल.

युवा आदर्श

### हरीराया ...

पांडुरंगा तव पंढरी
वसली मम हृदया
कधीतर नाम घेतो
भक्तावरी तरी दया
चंद्रभागा आतुरली
डोही सुखे न्हाह्या
पाप क्षालन करशी
अद्भुत ती किमया
थोपवी दया सागरा
माझे दुर्गुणी प्रलया
रक्षण करे सर्वेश्वरा
भोवती भक्ती वलया
द्रौपदीस वस्त्र देशी
धावी संकट समया
हरि कथा पारायणां
उजळे लक्ष समया
हरिनाम ध्वनी गर्जा
वाजे मंजूळ सनया
नाम स्मरण पक्वान्न
प्रियतम असे अनया
जिव्हा करी तूचंगोड
अभंगलागता गावया
कृपा प्रसाद पोटभरी
घालशी वेळी जेवया
सावळे रूप प्रगल्भ
पाहती सारे विस्मया
मावेना तद्रुपडोळिया
गा उंचावतात भुवया
केवळ हवा कवळ रे
भक्तीभाव निरामया
मोक्ष मिळो शांतरुप
आयु जाता अस्तमया

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### गुरु पौर्णिमा निमित्य महेश गिरी महाराज यांचे प्रवचन

## ज्यांनी केले गुरु, त्यांचा जीवनक्रम चांगला सुरू - महेश गिरी महाराज



**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** जाफ्राबाद या मधील मध्य भागी वसलेले प्रसिद्ध आणि या तालुक्याचे प्रचंड भक्ती भाव असलेल्या गौरी आश्रम मठाचे मठाधिपती आदरणीय महेश गिरी महाराज यांच्या पवित्र वाणीतून गुरु पौर्णिमा निमित्य त्यांच्या मधुर वाणीतून प्रवचन रुपी सेवा पार पडली.

गुरु पौर्णिमा हा सण चांगला साजरा झाला पाहिजे सोबत संताच्या आणि गुरूच्या ज्या सूचना आहे त्या पालन केल्या तर जीवनात कसलीही कमी पडणार नाही असे सांगून त्यांच्या कामाची आणि त्यांचा सूचनेची सेवा नक्कीच पार पडली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

प्रत्येकाने गुरू मंत्र घेऊन त्यांच्या मंत्राचा जप केल्यास तुमचे जीवन नक्कीच फलदायी होईल असे त्यांनी सांगितले.ज्यांच्या जीवनात नाही गुरु त्यांचे जीवन पान २ वर

## टेंभुर्णी पोलिस कर्मचारी यांच्या पाच जणांच्या बदल्या



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील टेंभुर्णी पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचाऱ्यांच्या जालना पोलिस अधीक्षक यांनी नुकत्याच बदल्या केल्या आहेत.

या पोलिस कर्मचाऱ्यांना टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन खामगळ यांनी कार्यमुक्त केले आहे या पोलिस कर्मचाऱ्यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यामध्ये पीएसआय रवी देशमाने चंदनझीरा पोलिस ठाणे जालना पोलिस हेड कॉन्स्टेबल गजेंद्र भुतेकर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पोलिस अंमलदार प्रदिप धोंडगे डी वाय एसपी कार्यालय भोकरदन पोलिस अंमलदार धनंजय जगदाळे हसनाबाद पोलिस ठाणे पोलिस अंमलदार मंगेश शिंदे हसनाबाद पोलिस अंमलदार गणेश खार्डे सेवली यांना कार्य मुक्त करून निरोप देण्यात आला यावेळी टेंभुर्णी पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी पंडित गवळी, सचिन तिडके, सागर शिवरकर, अन्य पोलीस कर्मचारी हजर होते.



**जालना जिल्हा तेली सेनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अतुल व्यवहारे यांचा सत्कार करतांना हिंगोली बँकेचे सहाय्यक सरव्यवस्थापक शाखा जालनाचे संजय गावडे, तेजस देशमुख, शुभम अग्रवाल, शेख अन्सार, शेख नजीर, रवींद्र सोनटक्के व रखमाजी बडवणे छायाचित्र दिसत आहे.**

## संत कृपेपायी फुलला भक्तीचा मळा गं, मन मंदिरात माझ्या विठू सावळा गं

### माधवी उगले यांच्या गायनाने रसिक भक्तीरंगी रंगले

**जालना । प्रतिनिधी -** संतकृपेपायी फुलला भक्तीचा मळा गं, मन मंदिरात माझ्या विठू सावळा गं' या माधवी उगले यांनी सादर केलेल्या व शाहीर प्रा. कल्याण उगले यांच्या रचनेने जालनेकर रसिकांना मंत्रमुग्ध केले. निमित्त होते कलावर्धिनी आणि जेईएस महाविद्यालयाच्या ललितकला विभाग यांच्या वतीने आषाढी एकादशी आणि गुरु पौर्णिमेच्या पूर्वसंध्येला आयोजित 'बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल' या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे.

महाविद्यालयाच्या चुन्नीलाल गिरीलाल सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाचे पान २ वर



# संपादकीय

## लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षापूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. दोन वर्षापूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## जालना शहरातील वाहतुकीच्या मार्गात बदल

**जालना । प्रतिनिधी -** श्री गजानन महाराजसंस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळ वारी परंपरेनुसार सदर पालखी पंढरपुर येथून परतीच्या मार्गावर आहे. तरी राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ सी वरील जालना-नाव्हा-सिंदखेड राजा रोडवरील येणारी व जाणारी वाहतूक व्यवस्था दि.२३ जुलै २०२५ रोजीचे सकाळी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत जड वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे.

सध्याचा प्रचलित असलेला मार्ग अंबड चौफुली-कन्हैयानगर बायपास जालना-नाव्हा-सिंदखेड राजा मार्गे सुलतानपूर- महकरकडे जाणारी व येणारी वाहतुक दि.२३ जुलै २०२५ रोजी कन्हैयानगर जालना मार्गे देऊळगाव राजा-चिखली या पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

### जागतिक लोकसंख्या दिन

# सुरवी जीवनाचा उपाय लोकसंख्या वाढीवर मात

जागतिक लोकसंख्या दिन - ११ जुलै २०२५ दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन ११ जुलै रोजी प्रत्येक वर्षी संपुर्ण विश्वात साजरा करण्यांत येतो. ११ जुलै १९८७ रोजी जगाची लोकसंख्या १ अब्ज झाल्याचे संयुक्त राष्ट्रीय कौन्सिलींग यांच्या निर्दशनास आले. तेंव्हापासुन ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यांत येतो. प्रथम जागतिक लोकसंख्या दिन हा ११ जुलै १९८९ रोजी साजरा झाला. सतत वाढणा-या लोकसंख्येचे दुष्यपरिणाम ंबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने ११ जुलै रोजी दरवर्षी जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. या वर्षीचे घोषवाक्य खालील प्रमाणे आहे. 'आई होण्यासाठी योग्य वय तेंव्हा, शरीर व मनाची तयारी जेंव्हा ' जगामध्ये वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक दाम्पत्याने कुंटूंब नियोजनाची जबाबदारी घेऊन यशस्वी पार पाडावी. लोकसंख्यावाढी मुळे विविध समस्याला तोंड द्यावे लागणार हे लक्षात येताचं शासनाने पंचवार्षिक योजना १९५१-५२ या मध्ये कुंटुंब कल्याण कार्यक्रमाचा अंर्तभुत करुन १९५२ पासुन राष्ट्रीय कुंटुंब कल्याण कार्यक्रम अंमलात आणला. आपणांस ज्ञातचं असेल की, जगामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश भारत प्र




थक क्रंमाकावर असुन दुस-या क्रंमाकावर चीन देश आहे. लोकसंख्या वाढ चिंतेचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, गरिबी, अन्न धान्य तुटवडा, निरक्षरता, गर्दी, प्रदुषण, रुग्णालयात रुग्ण वाढ, शिक्षणाचा अभाव, वाढते शहरीकरणामुळे झाडे कमी परिणामी पाऊस कमी त्यामुळे कोरडा दुष्काळाची वेळ निर्माण होते. नैतिकता व सामाजिकस्तर पातळी खाली जावुन गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये वाढ होते इत्यादी हे केवळ लोकसंख्या वाढीमुळे होत असेल तर यामध्ये चांगल्या दृष्टीकोनातुन या मध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे. म्हणुनचं म्हणतात 'लहान कुंटुंब सुखी कुंटुंब.' लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी विविध उपाय योजना, उपक्रम राबविण्यांत येत आहे. त्यापैकी एक म्हणजे राष्ट्रीय कुंटुंब कल्याण कार्यक्रम होय. शासकिय रुग्णालयातुन कुंटुंब नियोजनाची माहिती व उपक्रम बाबत सांगितले जाते. कुंटुंब कल्याण कार्यक्रमात दोन प्रकारच्या पध्दती आहेत एक कायम ची नसबंदी शस्त्रक्रिया व दुसरा प्रकार तात्पुरती कुंटूंब नियोजन पध्दत. यामध्ये स्त्री, पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केली जाते व तात्पुरती पध्दतीमध्ये गर्भनिरोधक गोळ्या, अंतरा इंजेक्शन, कॉपर-टी, निरोध इ. बाबत जनतेतः जागरुकता निर्माण केली जाते. ज्यामुळे लोकसंख्या नियंत्रण वाढीचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी लहान कुंटुंबाचे फायदे बाबत जनजागृती, बालविवाह कायदयाची अंमलबजावणी, राष्ट्रीय कुंटूंब कल्याण कार्यक्रमाची माहिती, प्रत्येक कुंटुंबाने परिवार नियोजनाचा सल्ला घेऊन अंमलबजावणी करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असले पाहिजे.

आवाहन : लहान कुंटूंब सुखी कुटुंब.

**- डॉ. जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, जालना.**

### आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सुरू

## मुख्याध्यापक आणि अधीक्षिका निलंबित - सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर

**मुंबई -** रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील वरवणे येथील आश्रमशाळेतील विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी मुख्याध्यापक आणि वस्तीगृह अधीक्षिकेला निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य राजकुमार बडोले, धर्मरावबाबा आत्राम, नाना पटोले यांनी प्रश्न उत्तरेच्या तासात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री आबिटकर बोलत होते.

राज्यात 'कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम)' हे अभियान राबविण्यात येत असून त्याअंतर्गत नियमित आरोग्य तपासणी व सर्वेक्षण केले जाते. याच सर्वेक्षण दरम्यान वरवणे येथील आश्रमशाळेतील कुमारी खुशबू ठाकरे या विद्यार्थिनीच्या डाव्या डोळ्याखाली चट्टा आढळून आला. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार तिच्यावर कुष्ठरोग विरोधी बहुविध औषधोपचार सुरू करण्यात आले होते. दुर्दैवाने, उपचार सुरू असतानाच तिचा मृत्यू झाला. या प्रकरणाची चौकशी सुरू असून शवविच्छेदन अहवालानुसार टिशू ॲस्ट्रोपॅथोलॉजिकल तपासणी व रक्तनमुने केमिकल विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल.

दरम्यान, आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण यांच्या स्तरावर देखील या प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित मुख्याध्यापक आणि महिला अधीक्षिका यांना अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी निलंबित केले असून त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे. तसेच या विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांना २ लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देखील देण्यात आले आहे. आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थिनींसाठी आरोग्यविषयक आवश्यक उपाययोजना करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला सूचना देण्यात येतील, असेही सार्वजनिक आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी सभागृहात सांगितले.

## नवीन इमारतीत मराठी भाषिक व्यक्तींना घरे खरेदी करण्यासंदर्भातील धोरण - मंत्री शंभूराज देसाई

**मुंबई -** मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र हा मराठी माणसाचा आहे. मुंबईत घरे खरेदी करताना कोणत्याही मराठी माणसाचा हक्क कुणालाही डावलू दिला जाणार नाही. जर एखादा विकासक मराठी माणसाला घरे विक्रीसाठी नाकारत असेल, अशा विकासक किंवा व्यक्तीवर कठोर कारवाई केली जाईल. मराठी माणसाच्या हक्कांचे रक्षण व्हावे आणि मराठी माणसाला घरे खरेदीसाठी प्राधान्य मिळावे, यासाठी लवकरच धोरण निश्चित केले जाईल. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून पुढील धोरण निश्चित केली जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.

# निसर्गाचा ह्यास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास सर्वांनाच भोगावा लागेल

लोकसंख्या अशीच वाढत राहाली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रासजगातील प्रत्येक व्यक्तीला,संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल.वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले.ही बातमी जगभर पसरली.त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवु लागले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी) गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली.या शिफारशी नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती.यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले. यानंतर आफ्रिका, युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता.भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती.ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे.हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.२०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन, भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान, ब्राझील, नायजेरिया, बांगलादेश, रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात.हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भुभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भुभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून सर्वच मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे.त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा.वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे.यामुळे बेरोजगारी, भुकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन,आरोग्य विषयक सुविधांचा अभाव,औषधांची समस्या, मुलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्याचप्रमाणे औद्योगिकीकरण व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरीता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे.म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे.त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेतांना दिसतात.भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने एक परीवार एकच अपत्य असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल.अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर मानुस मानसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात. भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे.आज जगाला लोकसंख्या वाढी पेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे. कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे. त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे. याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी सुखसमाधानासाठी लोकसंख्या वाढवीली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे.ही परीस्थिती मानवाने स्वतःहुन ओढावली आहे. मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसत आहे.त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहेच सोबतच पाण्याचे उष्णतामान सुध्दा वाढत आहे.म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भुभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते.कोव्हिड-१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे.चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात.त्यामुळे चीन विस्तारवादाचे घृनीत कृत्य करतांना दिसतो.हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे.चीनच्या विस्तारवादाच्या भुमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक-मेकावर बंदुक ताणुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे.यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही.त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ,कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो.यामुळे घातक आजार सुध्दा होवु शकतात आणि होत आहे.यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय. अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे. याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे.जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे.लोकांच्या सुखसुविधांकरीता विमान वाहातुक,रोड वाहातुक,रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दीसतात यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे.त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत.काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु-पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत रहाली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आनले पाहिजे. लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येवु शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे. जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत रहाली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतीरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही. त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होने गरजेचे आहे.केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वोतोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशांनी आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## रुग्णालयांना पॅनलवर समावेशासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लाभ मिळून आरोग्य सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त खाटांच्या रुग्णालयांचा आणि विशिष्ट १० खाटांच्या एकल विशेषता रुग्णालयांचा एकत्रित आयुष्मान भारत (B PM-JY) आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत (MJPJY) पॅनलवर समावेश करणे आहे. तरी जालना जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, जिल्ह्यातील ३० पेक्षा जास्त खाटा असलेल्या रुग्णालयांचा तसेच विशिष्ट एकल विशेषता (Single Speciality) असलेल्या १० खाटांच्या रुग्णालयांचा एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (B PM-JY) आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना (चगझगध) यांच्या पॅनलवर समावेश करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळेल आणि जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम होतील. अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

पात्र एकल विशेषता रुग्णालये (१० खाटांचे):

१. ENT (नाक, कान, घसा)
२. Ophthalmology (नेत्रविकार)
३. Orthopaedic Polytrauma (अस्थिव्यंग आणि पॉलिट्रॉमा) ४. Burns (भाजणे)
५. Paediatric Surgery (बालरोग शस्त्रक्रिया)
६. Oncology Units (कर्करोग उपचार युनिट्स)
७. Neonatal Paediatric Medical Management Units (नवजात आणि बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन युनिट्स)
८. Maintenance of Haemodialysis (Nephrology) Units (हिमोडायलिसिस मूत्रपिंडशास्त्र युनिट्स)

**योजनांचा उद्देश**

B PM-JY: केंद्र सरकारची ही योजना देशभरातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार प्रदान करते. यामध्ये १३५६ प्रकारच्या गंभीर आजार, शस्त्रक्रिया आणि रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा समावेश आहे. चगझगधः महाराष्ट्र सरकारची ही योजना राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार देते. यामध्ये १३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया आणि विशेष उपचारांचा समावेश आहे.

**पॅनलवर समावेश प्रक्रियाः**

**पात्रता निकष** - ३० पेक्षा जास्त खाटा असलेली रुग्णालये आणि वर नमूद केलेल्या विशेषता असलेली १० खाटांची एकल विशेषता रुग्णालये, जी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण (छक) आणि महाराष्ट्र राज्य आरोग्य हमी सोसायटी निकषांची पूर्तता करतील, ती इ झच-गध आणि चगझगध योजनांच्या पॅनलवर समावेशासाठी पात्र ठरतील. यामध्ये आधुनिक वैद्यकीय उपकरणे, प्रशिक्षित वैद्र्यकीय कर्मचारी आणि उच्च दर्जाची रुग्णसेवा यांचा समावेश आहे.

लाभः पॅनलवरील रुग्णालयांमध्ये या दोन्ही योजनांतर्गत लाभार्थ्यांना मोफत उपचार मिळतील. यामुळे गंभीर आजारांवरील उपचार परवडणारे होतील आणि रुग्णांचे आर्थिक भार कमी होईल.

अर्ज प्रक्रियाः रुग्णालयांनी पॅनलवर समावेशासाठी https://www.jeevandayee.gov.in (MJPJY) या संकेतस्थळांवर ऑनलाइन अर्ज करावा. तसेच, जालना जिल्हा रुग्णालय जिल्हा समन्वयक किंवा जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती मिळवता येईल.

**जिल्ह्यातील प्रमुख रुग्णालये -** जालना जिल्ह्यातील अनेक रुग्णालये, ज्यांचे ३० खाटांची रुग्णालये व नमूद केलेल्या विशेषतः असलेली १० खाटांची रुग्णालये देखील या योजनेत सहभागी होण्यासाठी पात्र ठरू शकतात.

**जिल्हा प्रशासनाचे आवाहन -**

जालना जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभाग सर्व पात्र रुग्णालयांना, मग ते ३० पेक्षा जास्त खाटांचे असोत किंवा १० खाटांचे एकल विशेषता रुग्णालये असोत, इ झच-गध आणि चगझगध योजनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करते. यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांना मोफत वैद्यकीय सुविधा मिळतील. नागरिकांना जवळील पॅनलवरील रुग्णालयांची माहिती https://www.jeevandayee.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी किंवा पॅनलवर समावेशासाठी, कृपया जालना जिल्हा रुग्णालय, दूरध्वनीः ८२७५०९५८१० येथे संपर्क साधावा किंवा https://www.jeevandayee.gov.in वर भेट द्यावी. जालना जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या माहितीसाठी जारी करण्यात आली आहे. रुग्णालयांनी पॅनलवर समावेशासाठी स्वतः पात्रता तपासावी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. व https://www.jeevandayee.gov.in सदरील संकेत स्थळावर अर्ज करावा. असेही कळविले आहे.

# सुशिक्षित मुलांनो काम करायला लाजू नका!

आजकाल प्रत्येक सुशिक्षित मुलांना आपल्या शिक्षणाचा प्रचंड गर्व आणि अभिमान वाटत आहे. म्हणून ते स्वतःला जरा भारी आणि उच्च दर्जाचा मानत आहेत. म्हणून त्यांना शेतीची, कष्टाची व मेहनतीची कामे करायला लाज वाटत आहे. त्यांना वाटत असते की, मी उच्चशिक्षित आहे, पदवीधर आहे, अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे, मी विज्ञान शाखेचा दर्जेदार विद्यार्थी आहे. मी भविष्यात खूप मोठा अधिकारी होणार आहे आणि मी असले नीच व हिन दर्जाची कामे करायला काय वेडा आहे का? चांगल्या आणि दर्जेदार लोकांमध्ये राहणे आणि दर्जेदार कामे करणे हे सुशिक्षित मुलांचे लक्षण असते. मी कोणतेही हिन दर्जाचे कामे करू लागलो तर माझी सामाजिक प्रतिष्ठा कमी होईल, लोक मला नावे ठेवतील, मला टोमणे मारतील आणि माझी थट्टा उडवतील म्हणून कोणतेही नीच व किरकोळ कामे करणे हे माझ्यासारख्या उच्चशिक्षित व अष्टपैलू व्यक्तिमत्वाला शोभणारे काम नाही. ती कामे अशिक्षित मुलांची आहेत, ज्यांची शैक्षणिक पात्रता कमी आहे, जे अंगठे बहाद्दर आहेत, ज्यांना काम केल्याशिवाय पर्याय नाही, जो कधी शाळेतच गेला नाही, अशा मुलांना अशी कामे करायला शोभतात. असा आजकालच्या काही सुशिक्षित मुलांना मानस झाला आहे. माझ्यासारखी दर्जेदार व सुशिक्षित मुले जर अशी हिन व नीच दर्जाची कामे करू लागली तर आम्हाला लोक काय म्हणतील? समाजात आम्हाला किंमत राहील का? आमचा एवढा शिकून काय फायदा? म्हणून लोक काय म्हणतील या भीतीपोटी ते कष्टाची व मेहनतीची कामे करायला लाजत आहेत. त्यांना ऑफिसात खुर्चीवर आरामात बसून, फक्त कागदावर पेन चालवायची कामे त्यांच्या लायकीची व सन्मानाची वाटत आहेत. पण आजकाल सुशिक्षित बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढली आहे, त्यामुळे प्रत्येकाला त्यांच्या पात्रतेनुसार शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयात आरामदायी नोकरी मिळणे कठीण झाले आहे. शिक्षण क्षेत्रात नोकरीसाठी प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या याला कारणीभूत आहे. स्पर्धा निर्माण झाल्यामुळे प्रत्येकाला योग्यतेनुसार शासकीय आणि निमशासकीय नोकरी मिळणे सध्या फार अवघड होऊन बसले आहे. पण मुलांना वाटत आहे की, आज ना उद्या मला नोकरी मिळेल, म्हणून बहुतांश विद्यार्थी शिकून बेकार व आशावादी राहत आहेत. माझा उद्देश असा नाही की, तुम्ही नोकरीसाठी प्रयत्न करू नयेत, प्रयत्न तर जरूर केलेच पाहिजेत. पण काम करत करत शिकणे हे मला योग्य वाटत आहे. म्हणून नोकरी लागेपर्यंत स्वतः कष्ट करून शिकणे व आई-वडिलांना पोसणे प्रत्येक मुलाचे कर्तव्य असते. म्हणून आई-वडिलांच्या जीवावर अवलंबून न राहता, हाताला मिळेल ते काम करावे, मग ते काम शेतीचे असो किंवा गुरे राखायचे असो, वडापाव विकायचे असो किंवा पाणीपुरी विकायचे असो, भंगार वेचायचे असो किंवा हमाली करायचे असो, कोणतेही काम हे कामच असते. कामावरून माणसाचा दर्जा ठरत नसतो. म्हणून माणसाने कामाची लाज न बाळगता कोणतेही काम रुबाबात आणि दिमाखात केले पाहिजे. कामामध्ये भेदभाव करता कामा नये. कोणतेच काम लहान किंवा मोठे नसते, तर काम करणारा मोठा असतो आणि काम न करणारा लहान असतो. पण हे आजकालच्या सुशिक्षित मुलांना कळत नाही. ते कामावरून माणसाचा दर्जा ठरवतात. त्यांना काम करायची लाज वाटते पण आई-वडिलांच्या जीवावर बसून खायची लाज वाटत नाही. हे खरंच विचार करण्यासारखी बाब आहे. आज आपण बघत आहोत की, देशात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या किती वाढली आहे. प्रत्येकाला नोकरी मिळणे दुरापास्त झाले आहे. पृथ्वीतलावर माणसाला कामे भरपूर आहेत. पण प्रत्येकाच्या मनासारखे काम मिळणे अवघड आहे. आमच्या सुशिक्षित मुलांना मनाजोगे काम मिळावे वाटत आहे. पण त्यांचा गर्व आणि अहंकार त्यांना कोणतेही कामे करू देत नाही. सध्या आपण ग्रामीण व शहरी भागात पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, कित्येक सुशिक्षित मुले, आई-वडिलांच्या जीवावर कोणतेही काम न करता, निवांत बसून खात आहेत. आईवडील म्हातारे झाले आहेत, त्यांना आता वयोमानानुसार कष्ट होत नाहीत, त्यांना आता बसून खायचे दिवस आले आहेत, आता आपण कष्ट करून त्यांना जगवायचे असते, त्यांना सुखात व आनंदात ठेवायचे असते, याचे भान आजकालच्या सुशिक्षित मुलांना राहिले नाही. मुलगा काम करत नाही म्हणून कित्येक आईवडील मजबुरी म्हणून उतारवयात कष्ट करून आपल्या मुलांना पोसत आहेत. पण सुशिक्षित मुलांना आपण आई-वडिलांच्या जीवावर खातोय, त्यांचे रक्त पितोय याचे काहीच वाटत नाही. त्यांना कशाची लाज वाटते ना कशाची लज्जा. त्यांच्या स्वाभिमानाला ठेच लागत आहे, हे त्यांना कधी कळणार? वृद्ध आई-वडिलांच्या जीवावर बसून खायला लाज वाटत नाही पण मेहनतीची व कष्टाची कामे करून स्वबळावर जगायला लाज वाटते. स्वाभिमान कष्ट करून जगण्यात असतो...माय बापाच्या जीवावर बसून खाण्यात नसतो. हे आजकालच्या मुलांनी लक्षात घेतले पाहिजे. काही मुले लग्न झाल्यावर देखील कामे करत नाहीत. आई-वडिलांसोबत बायकोला कामाला पाठवतात आणि त्यांच्या जीवावर बसून खातात. हे चित्र सध्या ग्रामीण व शहरी भागात आपल्याला नक्की पाहायला मिळते. त्यांना बसून खायला लाज वाटत नाही पण कष्ट करायला लाज वाटते. कारण त्यांना वाटते की आम्ही उच्चशिक्षित आहोत, मी शालेय जीवनापासूनच कधी काम केले नाही. मी जर आता कामे करू लागलो तर लोक मला बघून हसतील, माझी टिंगल टवाळी करतील... शिकून तुझा काय फायदा झाला म्हणतील, पण मित्रहो जगाचा विचार करत बसू नका... या जगात स्वाभिमानाला महत्त्व आहे... ज्या माणसात स्वाभिमान असतो तो माणूस काम करायला कधीच लाजत नाही. उलट स्वाभिमानाने कष्ट करून लोकांना दाखवतो. तुमच्यात स्वाभिमान नसेल तर तुम्ही आत्महत्या केलेली बरी! शिक्षण घेऊन जर आपल्यातला स्वाभिमान जागा होत नसेल, तर मग असे तकलादू शिक्षण काय कामाचे? यांना बसून खायला लाज वाटत नाही पण काम करून जगायला लाज वाटते. मित्रांनो तुम्हाला भविष्यात नोकरी लागेलच हे काही सांगता येत नाही. तुम्ही उच्च पदस्थ अधिकारी व्हाल याचे अचूक भविष्य ओळखणारा भविष्यकार अजून तरी जन्माला आला नाही. नोकरीच्या नावावर आई-वडिलांना फसवू नका, कष्ट करून शिक्षण घेणारे आणि आई-वडिलांना जगवणारे होतकरू मुलेच नोकरीला लागतात. पण शिक्षणही आई-वडिलांच्या जीवावर घ्यायचे आणि बसूनही त्यांच्याच जीवावर खायचे, कष्ट करायचे नाहीत, अभ्यास करायचा नाही आणि मला नोकरी लागेल म्हणून सांगायचे, आणि शिक्षणाच्या नावावर आई-वडिलांचे आर्थिक शोषण करायचे, हे खरंच सुशिक्षित मुलांसाठी योग्य आहे का? काही सुशिक्षित मुले लग्न होऊन त्यांना मुले झाले तरीही आई-वडिलांच्या जीवावर बिनधास्त जगत आहेत. त्यांना घरगुती कामात व शेती कामात मदत देखील करत नाहीत. ज्यांना स्वतःच्या घरातील व स्वतःच्या शेतातील कामे करायची लाज वाटत असेल तर ही मुले भविष्यात काय काम करतील? हे कळायला मार्ग नाही. जगात असे अनेक सुशिक्षित मुले आहेत, जे की, नोकरी लागली नाही म्हणून खचून न जाता आणि कोणत्याच कामाची लाज न बाळगता, शहरात वडापाव विकत आहे, पाणीपुरी विकत आहेत, चहा विकत आहेत म्हणजे कोणतीच लाज न बाळगता स्वाभिमाने कोणताही व्यवसाय करत आहेत. त्यांना ना शिक्षणाचा गर्व... ना कोणत्या कामाची लाज... खरंच अशा कर्तृत्वान मुलांना सलाम करावा वाटतो, अशी अनेक मुले या जगात आहेत, ते स्वतः काम करून शिकतात आणि आई-वडिलांना पण पोसतात म्हणून अशा मुलांना जीवनात यश प्राप्ती होते. मान्य आहे की तुमच्या बापाकडे भरपूर पैसा व संपत्ती आहे म्हणून तुम्ही कष्ट करत नाहीत. त्यांच्या जीवावर बसून निवांत खाता. पण तुमच्या बापाने कमावून ठेवलेली संपत्ती आयुष्यभर जाऊ शकत नाही. ती कधी ना कधी संपतेच आणि तुम्हाला काम करायची वेळ येतेच, म्हणून कोणत्याच कामाची लाज न बाळगता श्रीमंत मुलांनी देखील कामाची सवय ठेवली पाहिजे. पैसा महासागर जरी असला तरी तो महासागर कधी ना कधी आटतोच. म्हणून पैसा संपण्याची वाट पाहू नका... कामाची सवय ठेवा, भविष्यात पश्चातापाची वेळ येणार नाही...एका मुलाचा बाप सरकारी नोकरीला होता आणि त्याला एक उच्चशिक्षित परंतु नोकरी नसलेला मुलगा होता, तो बापही त्या मुलाचा खूप लाड करायचा, त्याचे सर्व हट्ट पुरवायचा, त्याला म्हणेल तेव्हा पैसे द्यायचा, त्याला कशाचीच कमी भासू देत नव्हता, बापाच्या जीवावर चांगल्या पोशाखात वावरणे, मौज मजा करणे, ढाब्यावर जाऊन ऐश करणे हे तो रोज करायचा. त्याचे लग्न झाले, त्याला मुले झाली, तरीही तो काम काही करायचचा नाही. कारण वडील त्याचा घरप्रचंच चालवायचे. पण कालांतराने त्याचा बाप वारला. बापाचा पगार बंद झाला. बापाने कमावून ठेवलेल्या पैशात त्याने काही दिवस संसार चालवला पण काही दिवसाने बापाने कमावून ठेवलेला पैसा देखील संपला. त्याची मुले मोठी होऊ लागली, शिक्षणाचा खर्च वाढू लागला, संसाराला देखील पैसा लागू लागला, बापाने मिळवलेली संपत्ती, संपल्याने त्याची खाण्यापिण्याची आबाळ होऊ लागली.. कसेबसे मुलांचे शालेय शिक्षण पूर्ण केले, आणि नंतर उच्च शिक्षणासाठी त्याला पैशाची नितांत गरज भासू लागली. दोन मुली होत्या त्यांचे पण लग्नाचे वय होऊ लागले. त्याचे मानसिक प्रेशर वाढू लागले. तो सारखा चिंताग्रस्त राहू लागला. त्याच्यापुढे मुलींचे लग्न आणि मुलाचे शिक्षण दिसू लागले, त्याला कामाची सवय नसल्यामुळे, काम करायची लाज वाटू लागली. आता आपण कामाला गेलो तर लोक काय म्हणतील? आपण इतके दिवस बापाच्या जीवावर जगलो आणि आता जर आपण अचानक काम करू लागलो तर गावातील लोक आपल्याला काय म्हणणार? हा विचार त्याच्या मनात सारखा रुंजी घालू लागला. आणि तो ढसाढसा रडू लागला. त्याला त्याच्या मित्रांनी सल्ला दिला की, तुला गावावर काम करायची लाज वाटत असेल, तर तू बाहेरगावी जाऊन काम कर, म्हणून मित्रांने त्याला सांगितले आणि त्याने आता ठरवले की, आपण गावावर काम करायचे नाही, दुसरीकडे कुठेही जाऊन काम करायचे. तो आता दुसऱ्या गावात जाऊन कष्टाची व मेहनतीची कामे करतोय आणि गावकऱ्यांना म्हणतोय की,मी ऑफिसमध्ये नोकरी करतोय, आणि मला भरपूर पगार मिळतोय. म्हणजे मित्रहो त्या मुलाला लग्न झाल्यावर काही वर्षांनी गाव सोडून काम करायची वेळ येत आहे. जर त्याने आधीपासूनच काम केले असते... तर त्याला रडायची व गाव सोडायची वेळ आली नसती... पण त्याला उच्चशिक्षित असल्यामुळे कष्टाची व मेहनतीची कामे करायची लाज वाटू लागली. म्हणून त्याला लग्न झाल्यावर का होईना पण काम करायची वेळ आलीच. म्हणून सुशिक्षित बांधवांना मी सांगू शकतो की, मुलांनो तुम्ही देखील आई-वडिलांच्या जीवावर जगत राहू नका. कष्ट करत करत शिका, स्पर्धा परीक्षा द्या..कोणतेच काम लहान नसते, शून्यातून सुरुवात करा, त्यासाठी वडापाव विका, पाणीपुरी विका, टपरी चालवा, एखादा छोटा उद्योग करा, कोणतीही कामे करा पण करा! त्या कामाची बिलकुल लाज वाटू देऊ नका...अनेक महापुरुष काम करत करत शिकले आणि जगाने त्यांना महापुरुष म्हणून स्वीकारले, हे ध्यानात ठेवा. खडतर व अपयशाच्या वाटेने प्रवास केल्याशिवाय यशाचा व सुखाचा पल्ला गाठता येत नाही. म्हणून जीवनात खूप खूप कष्ट करा, कष्टाच्या बळावर स्पर्धा परीक्षा द्या, यशस्वी होऊन स्वतःच्या जीवावर मौज मजा करा... स्वाभिमानाने व अभिमानाने जगा...केवळ आई-वडिलांच्या जीवावर अवलंबून राहिलात आणि कष्टाची लाज ठेवलात तर तुमच्यावर देखील भविष्यात ढसाढसा रडायची आणि गाव सोडून कामे करायची वेळ आल्याशिवाय राहणार नाही.

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६७**

**पान १ वरुन**

## अनुदान घोटाळ्यातील ...

आहे त्या सर्व शेतकऱ्यांची केवायसी पूर्ण करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून या सर्व शेतकऱ्यांना अनुदान वितरित करण्यात यावी अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केली.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नावे २४ कोटी रुपयांची रक्कम वळवण्यात आली असून या शेतकऱ्यांची अंबड व घनसावंगी तालुक्यामध्ये इंचभर सुद्धा जमीन नाही असे असताना दोषी अधिकाऱ्यांनी या शेतकऱ्यांच्या नावाचा वापर करून मोठा अपहार केला आहे यामध्ये ज्याप्रमाणे तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी संयुक्त पाहणी करणे अपेक्षित होते त्याचप्रमाणे तहसीलदार यांच्या लॉगिन आयडी व पासवर्ड मधून रक्कम वितरित करण्यात आली ही बाब देखील तितकीच गंभीर आहे त्यामुळे निलंबित करण्यात आलेल्या ७४ अधिकारी कर्मचाऱ्यांमध्ये अंबड व घनसावंगी तहसीलदाराचा देखील समावेश करण्यात यावा अशी जोरदार मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केली.

## युवक कल्याण ...

असोसिएशनचे सचिव प्रा. शेख चांद पी. जे., भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुहास मुंडे, राजा शिवछत्रपती मार्शल आर्ट्स असोसिएशनचे उपाध्यक्ष अशोक पडूळ,आंतरराष्ट्रीय खेळाडू मयूर पिवळ, इंजि. शुभम टेकाळे यांनी निवासी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण राज्यात युवक कल्याण शिबिरांचे अनुदान दरवर्षी वितरित होत असताना केवळ जालना जिल्ह्यातच ते गेल्या सात वर्षापासून बंद आहे. परिणामी विविध सेवाभावी संस्था, युवक गट आणि क्रीडा संघटनांचे उपक्रम ठप्प झाले असून, सामाजिक कार्यावरही त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. या अनुदानवाटपात काही अधिकाऱ्यांच्या आणि मध्यस्थांच्या हस्तक्षेपामुळे गैरव्यवहार झाल्याचा संशयही निवेदनकर्त्यांनी व्यक्त केला आहे. वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, स्वच्छता मोहीम, समूहदर्शक उपक्रम आदींसाठी अनुदान न मिळाल्यामुळे जालना शहराच्या सामाजिक प्रगतीला खीळ बसत आहे, असे मत संस्थांनी मांडले. दरम्यान, जिल्हा क्रीडा संकुलाचे उद्घाटन होऊन तब्बल नऊ महिने उलटले तरीही अद्याप ते खेळाडूंना नियमित सरावासाठी खुले करण्यात आलेले नाही. विविध खेळांसाठी आवश्यक साहित्य संकुलात धुळखात पडून आहे. काही साहित्य चोरीस गेले असून काही खराबही झाले आहे, तरीही ते खेळाडूंना वितरित करण्यात आलेले नाही. परिणामी, जिल्ह्यातील क्रीडाक्षेत्रात मरगळ निर्माण झाली आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या अखत्यारीतील कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलातही कोणतेही ठोस विकासकार्य झालेले नाही. शहराच्या क्रीडा अधिष्ठानाच्या दृष्टीने हे अत्यंत गंभीर असून, जिल्ह्यातील खेळाडूंना याचा थेट फटका बसत असल्याचे निवेदनात नमूद करून युवक कल्याण अनुदान तात्काळ सुरु करावे, जिल्हा क्रीडा संकुल खेळाडूंकरिता खुले करावे, धुळखात पडलेले क्रीडा साहित्य पात्र संघटनांना वितरित करावे, महानगरपालिकेच्या क्रीडा संकुलाचा विकास करावा आणि अनुदान बंदीमागील संभाव्य भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी, आदी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

## सेवाभावी संस्थाचे ...

नाही. सात वर्षापासून अनुदान बंद करून एक प्रकारे अन्याय करण्यात येत असल्याची बाब खेदजनक आहे. महाराष्ट्रात सर्वत्र अनुदान दिले जात असताना, केवळ जालनाच वगळला जाणे हा दुजाभाव असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.

## ज्यांनी केले ...

कसे राहिला चांगले सुरू.ज्यांनी गुरु नाही केला त्यांचा जन्म वाया गेला असे ही त्यांनी सांगितले.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः, गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमःअसे सांगून गुरु ची महिमा त्यांनी विषद केली.देव म्हणतात की जे आहे माझ्या नामात मी येईल त्यांचा कामात असे सांगितले.

जीवनात मर्यादा साठी गुरू ची संगत आणि संतांची व सत्संगाची गरज असून ज्यांचे मन अस्थिर आहे त्यांनी जीवनात स्थिर समाधान येण्यासाठी गुरु करण्याची गरज असून गुरू केल्याने त्यांचे शक्ती ने तुमचे कल्याण झाल्या शिवाय राहणार नाही असे ही सांगितले.या वेळी महाप्रसाद ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## संत कृपेपायी ...

प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, सुलभा कुलकर्णी, प्रकाश कुंडलकर, डॉ. यशवंत सोनुने, दिनेश संन्यासी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. मोहिनी रायबागकर यांच्या रामकृष्णहरी या हरिनामाने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला. त्यानंतर वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार रूप पाहता लोचनी आणि सुंदर ते ध्यान हे अभंग सादर करण्यात आले. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरु एक जगी आणि विठ्ठलाचे बोल बोलू या ओव्या व अभंगांनी रसिकांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात लोककला विभागाचे प्रमुख प्रा. कल्याण उगले यांच्या संचाने पांडुरंगा करू प्रथम नमन या अभंगाने भक्तीरस अधिकच गहिरा केला. शोहेब शेख यांनी सद्गुरूसारखा असता पाठीराखा हे भावभजन सादर करत गुरूंच्या महत्त्वाचे स्मरण करून दिले. प्रा. कल्याण उगले आणि आदित्य मुदिराज यांनी या विठूचा गजर, हरिनामाचा झेंडा रोविला हे गीत सादर करत भक्तीचा झेंडा उंचावला. तसेच, माधवी उगले व ज्ञानेश उगले यांनी सादर केलेल्या लेक लाडकी संतांची या भारुडातून भक्ती आणि सामाजिक भाष्य यांचे उत्तम संयोजन अनुभवायला मिळाले.

आनंद घुले यांनी क्लारनेटवर भेटी लागे जीवा या अभंगाचे सुरेल सादरीकरण करून संपूर्ण सभागृहात भक्तीरसाची उधळण केली. त्यानंतर ज्ञानेश उगले यांनी पंढरपुरात काय वाजत-गाजत हे भक्तिगीत सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी हरेश उगले आणि सर्व कलावंतांनी मिळून माऊली माऊली हे भक्तिगीत सादर केले, तर प्रतीक साळुंखे यांनी अवघे गर्जे पंढरपूर चालला नामाचा गजर हे भक्तिगीत सादर करून समारोप केला.

डॉ. मोहिनी रायबागकर आणि सहकाऱ्यांच्या स्वरात बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल आणि माऊली, गुरु माऊली, आमची ज्ञानेश्वर माऊली या भैरवीने भावपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली. या संपूर्ण कार्यक्रमात जय कराड (तबला), प्रतीक साळुंखे (हार्मोनियम), हरेश उगले (कीबोर्ड), ओंकार सुलाखे (बासरी), आनंद घुले (क्लारनेट), प्रा. कल्याण उगले (पखवाज व ढोलकी), सोहम उगले (साईड रिदम), गणेश साळवे, विशाल उगले, सुमेध वाहुळे (पर्कशन वादक) या कलाकारांनी उत्कृष्ट साथसंगत केली.

कार्यक्रमाचे रसाळ निरूपण अभिनेते, गीतकार विनोद जैतमहाल यांनी केले तर डॉ. बी. जी. श्रीरामे यांनी आभार मानले. या प्रसंगी जालना शहरातील कला, संगीत आणि साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर रचनाचे सहाय्यक संचालक खरवडकर यांच्या सेवाभावी कार्याचा क्रेडाईतर्फे गौरव



**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील नगर रचना विभागात तीन दशकांहून अधिक काळ अतिशय निष्ठेने, पारदर्शकतेने आणि जनतेसाठी समर्पित राहून कर्तव्य बजावणारे सहाय्यक संचालक सुमेध खरवडकर हे नुकतेच सेवानिवृत्त झाले असून, सेवापूर्ती सोहळ्यात जालना क्रेडाईच्यावतीने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

बुधवार दि. ९ जुलै रोजी पार पडलेल्या सेवापूर्ती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र महेश्वरी महासभेचे महामंत्री सत्यनारायण सारडा यांची उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना श्री. खरवडकर म्हणाले की, मी माझं कर्तव्य म्हणजेच ईश्वर सेवा मानली. निस्वार्थ आणि इमानदारीने काम केल्याने मी निवृत्त होताना अत्यंत समाधानी आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विठ्ठल पवार म्हणाले, श्री. खरवडकर हे बोले तैसा चाले, त्याची वंदावी पावले, याप्रमाणे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या कार्यात उक्ती आणि कृती यात कोणताही फरक नव्हता. जालना, बदनापूर, अंबड, तीर्थपुरी, घनसांगवी आणि मंठा यांसारख्या ठिकाणांचे विकास आराखडे तयार करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात नगर रचना विभागात रचना सहाय्यक या पदावरून केली. जवळपास ३५ वर्षे महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना खात्यात त्यांनी अविरत सेवा केली आणि सहाय्यक संचालक या पदावरून सेवानिवृत्त झाले. संभाजीनगर, जालना, बीड अशा मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांत त्यांनी काम करताना, कोणतीही गटबाजी, जातीभेद किंवा राजकीय हस्तक्षेप न स्वीकारता, केवळ कायदा आणि नियमांच्या चौकटीत राहून कार्य केले, असे गौरवउद्गार डॉ. पवार यांनी काढले.सत्यनारायण सारडा म्हणाले की, शासनात सुचोटीने, प्रामाणिकपणे आणि तत्परतेने काम करणारी व्यक्ती म्हणजे सुमेधजी खरवडकर. त्यांच्या वागणुकीत, निर्णयात आणि संवादात एक विशेष सौजन्य आणि शिस्त आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमास अभय कुलकर्णी, विष्णू पाटेकर, सिद्धांत शर्मा, शरद जयस्वाल, वामनराव राऊत, रितेश मंत्री, दिपक अंभोरे, शेखर जैस्वाल, वैभव बंब, सुनील भावसार यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेतन मराठे यांनी केले. सूत्रसंचालन रवींद्र हुसे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार दुर्गेश अग्रवाल यांनी मानले.

महावीर इंटरनॅशनलतर्फे अरुणिमा विद्यालयात शालेय साहित्य वाटप

# लखपती होणे सोपे तर लोकपती होणे अवघड काम - हस्तीमल बंब

## मुलांनी मोबाईल आणि व्यसनापासून दूर राहावे - विजयराज सुराणा



**जालना । प्रतिनिधी -** महावीर इंटरनॅशनलतर्फे सोमवार दि. ७ जुलै रोजी जालना शहराजवळ असलेले रोहनवाडी येथील अरुणिमा विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हस्तीमल बंब हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महावीर इंटरनॅशनलचे जिल्हाध्यक्ष विजयराज सुराणा, देवेंद्र सावकार, सुभाष सोनवणे, शाळेचे अध्यक्ष बाळासाहेब तनपुरे, पुकारचे कार्यकारी संपादक भारत एखंडे आदींची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हस्तीमल बंब म्हणाले की, विद्यार्थी उद्याचे भवितव्य आहे, आरोग्य प्रथम संपत्ती आहे. शिक्षणामुळे तुम्ही चांगल्या मोठ्या पदावर जाऊ शकता. राष्ट्रपती, पंतप्रधान, मोठे अधिकारी बनू शकता, हे सांगताना त्यांनी त्यांच्या जीवनातील एक उदाहरण दिले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.